# नागरिकांची सनद

राजभाषा संचालनालय

गोवा सरकार

1ली लिफ्ट, 5 वा मजला, जुन्ता हाऊस,

पणजी- गोवा

दूरध्वनी क्र.: 0832-2420071/2420179 फॅक्स: 0832-2420071

संकेतस्थळ: **www.dol.goa.gov.in**

ई-मेल: **dir-dol.goa@nic.in,**

**official.language09@gmail.com**

## परिचय

राजभाषा संचालनालय हे गोव्याची राजभाषा आणि गोव्यात प्रचलित असलेल्या इतर भाषांच्या विकासासाठी राज्य सरकारने सुरू केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे. स्थानिक भाषांचे महत्त्व लक्षात घेऊन, राज्य विधानसभेने गोवा राजभाषा अधिनियम, 1987 संमत केला, ज्यामध्ये असे म्हटले आहे की, "देवनागरी लिपितील कोंकणी भाषा" ही राज्याची राजभाषा असेल आणि या अधिनियमात मराठी भाषेसाठी तरतूद असल्यामुळे, सर्व किंवा कोणत्याही कार्यालयीन कामासाठी तिचाही उपयोग करता येईल.

वर्ष 2004 मध्ये सरकारने गोवा राजभाषा अधिनियम 1987 ची अंमलबजावणी करण्याच्या जबाबदाऱ्यांसह स्वतंत्र अर्थसंकल्पीय शीर्ष दिले. सध्या, राजभाषा संचालनालय राज्यात प्रचलित असलेल्या भाषांच्या विकासासाठी विविध योजन राबवित आहे.

या खात्यातर्फे राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा आणि सेवांचा प्रमुख भाग हा सरकारी खाती किंवा सरकारी कर्मचारी आणि सरकारने स्थापन केलेल्या स्वायत्त संस्था यांच्यासाठी आहे. राजभाषा संचालनालय हे, कोंकणी भाषेतील शब्दावली तयार करणे, संशोधन उपक्रम इत्यादीसाठी आवश्यकतेनुसार राजभाषा व इतर स्थानिक भाषांच्या विकासासाठी विविध योजना, प्रशिक्षणे सुरू करून आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार करीत आहे.

## लक्ष्य आणि ध्येय

a) राजभाषा अधिनियम, 1987 ची अंमलबजावणी.

b) प्रशासनामध्ये तसेच ज्ञानाच्या इतर क्षेत्रांमध्ये राजभाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी उपाययोजना करणे.

c) कार्यशाळा, परिसंवाद इत्यादींमार्फत विविध योजनांद्वारे प्रशिक्षण देणे.

d) कोंकणी आणि मराठी भाषांच्या प्रचारासाठी आणि विकासासाठी सरकारी/निमसरकारी कर्मचाऱ्यांना संगणकावर देवनागरीतून टंकलेखनाचे प्रशिक्षण देणे.

e) भारत सरकारच्या नवी दिल्ली येथील वैज्ञानिक आणि तांत्रिक शब्दावली आयोगाच्या मदतीने कोंकणी भाषेमध्ये विविध शब्दकोष तयार करणे.

## *प्रदान करण्यात येणाऱ्या सेवांचे तपशील*

1. सरकारी खात्यांकडून प्राप्त झालेल्या विविध प्रकारच्या दस्तऐवजांचे भाषांतर.
2. सरकारी कर्मचाऱ्यांना राजभाषेतून प्रशिक्षण देणे.
3. सरकारी कर्मचाऱ्यांना देवनागरी संगणक टंकलेखनाचे प्रशिक्षण देणे.
4. वैज्ञानिक आणि तांत्रिक शब्दावली आयोगाच्या सहकाऱ्याने वेगवेगळया विषयांवरील विविध शब्दकोष तयार करणे.
5. राजभाषेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध योजना तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे.
6. राजभाषा अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यशाळांचे/परिसंवादांचे आयोजन करणे.
7. कोंकणी आणि मराठी भाषांच्या विकासासाठी अनुक्रमे गोवा कोंकणी अकादेमी आणि गोवा मराठी अकादमी या सरकारस्थापित संस्थांना आवर्ती अनुदान देणे.
8. कोंकणी भाषेच्या प्रसारासाठी कार्य करीत असलेल्या अखिल भारतीय कोंकणी परिषद, कोंकणी भाषा मंडळ आणि दाल्गादो कोंकणी अकादेमी यांसारख्या बिगर सरकारी संस्थांना आधाररूपी अनुदान देणे.
9. सर्व सरकारी संकेतस्थळे बहुभाषिक (कोंकणी, मराठी, इंग्रजी इ.) करण्यासाठी भाषांतर सेवा पुरविणे.
10. विविध फलक, नामफलक, चिन्ह फलक इत्यादींचे कोंकणीमध्ये आणि मराठीमध्ये भाषांतर करणे.

## *संस्थात्मक तक्ता (मंजूर संख्याबळ)*

**संचालक, राजभाषा**
(खाते प्रमुख)

- **उपसंचालक (राजभाषा)**
  (कार्यालय प्रमुख)
- **कनिष्ठ लघुलेखक 01 पद**

### कोंकणी विभाग

1. वरिष्ठ भाषांतरकार (कोंकणी) 01 पद
2. कनिष्ठ भाषांतरकार (कोंकणी) 08 पदे

### मराठी विभाग

1. वरिष्ठ भाषांतरकार (मराठी) 01 पद
2. कनिष्ठ भाषांतरकार (मराठी) 08 पदे

### प्रशासन/लेखा विभाग

1. मुख्य कारकून 01 पद
2. कनिष्ठ लघुलेखक 01 पद
3. वरिष्ठ कारकून 01 पद
4. कनिष्ठ कारकून 04 पदे
5. चालक 02 पदे
6. शिपाई 03 पदे

### भाषा संशोधन विभाग

1. सहायक संचालक (संशोधन आणि प्रशिक्षण) - 01 पद
2. भाषा संशोधन अधिकारी (शैक्षणिक) (कंत्राटी तत्त्वावर) - 01 पद
3. भाषा संशोधन सहायक (शैक्षणिक) (कंत्राटी तत्त्वावर) - 02 पदे
4. संगणक विश्लेषक (तांत्रिकी) (कंत्राटी तत्त्वावर) - 01 पद
5. कनिष्ठ भाषांतरकार (हिंदी) (Hindi) - 01 पद

## *राबविण्यात येणाऱ्या योजना*

1) **राजभास प्रशिक्षण येवजण (प्लॅन):**

या योजनेअंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाज राजभाषेतून करण्यास सुलभ व्हावे म्हणून प्रशिक्षण देण्यात येते.

2) **"आमचो गांव, आमची परंपरा, आमचें दायज"**

या योजनेअंतर्गत गोव्याची संस्कृती, परंपरा, विधी, वारसा, सामाजिक-भाषिक इत्यादिंशी संबंधित विषयांवर पुस्तके लिहिणाऱ्या किंवा भाषांतरित करणाऱ्या देवनागरी लिपीतील कोंकणी आणि मराठी भाषांतील ग्रंथकर्ते/लेखक/भाषांतरकार यांना आर्थिक मदत/सहाय्य पुरविण्याचा राजभाषा संचालनालयाचा मानस आहे. प्रस्ताव सादर करण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रांतून जाहिरात देऊन इच्छुक अर्जदाराकडून अर्ज मागवले जातात.

3) **भाषा पुरस्कार योजना (प्लॅन):**

भाषा विद्वानांच्या गुणात्मक कार्याला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने या योजनेची रचना करण्यात आली आहे. कोंकणी, मराठी आणि संस्कृत भाषांच्या हितासाठी आपली कारकीर्द समर्पित केलेल्या व्यक्तींना मानधन, प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करणे हा या योजनेचा हेतू आहे. दरवर्षी पात्र अर्जदारांकडून अर्ज मागविले जातात. भाषा पुरस्कार खालील प्रमाणे दिले जातातः

(a) कोंकणी भाषेसाठी ज्ञानपीठकार रविंद्र केळेकार कोंकणी भाशा पुरस्कार.

(b) मराठी भाषेसाठी बा. द. सातोस्कर मराठी भाषा पुरस्कार.

(c) संस्कृत भाषेसाठी दुर्गाराम उपाध्ये संस्कृत भाषा पुरस्कार.

4) भाषा विकास योजना (प्लॅन) :

या योजनेअंतर्गत, कोंकणी, मराठी आणि संस्कृत भाषांच्या विकासासाठी कार्यशाळा, संमेलन कार्यक्रम इत्यादी साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी साहित्यिक संस्था आणि शैक्षणिक संस्थांना अनुदान दिले जाते. वर्तमानपत्रातं जाहिरात देऊन पात्र संस्थांकडून अर्ज मागवले जातात.

5) राजभाषा जागृती योजना (प्लॅन) :

प्रशासन आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये राजभाषेच्या विकासासाठी विविध कार्यक्रम, कार्यशाळा, व्याख्याने इत्यादी आयोजित करणे हा या योजनेचा हेतू आहे. राजभाषा संचालनालयातर्फे या योजनेची थेट अंमलबजावणी केली जाते. या योजनेअंतर्गत साहित्यिक/शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने राजभाषेला चालना देणारे कार्यक्रम आयोजित केले जातात. यात कोणतेही अनुदान दिले जात नाही तथापि, खर्च राजभाषा संचालनालयातर्फे केला जातो.

## *तक्रार निवारण यंत्रणेचे तपशील*

### सार्वजनिक तक्रार अधिकारी

| अनु. क्र. | सार्वजनिक तक्रार अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | टपाल पत्ता | दूरध्वनी क्र. |
|---|---|---|---|
| 1. | उपसंचालक (राजभाषा) | जुन्ता हाऊस, 1ली लिफ्ट, 5वा मजला, पणजी, गोवा पिन-403001. | 2420179/ 2420071 |

माहिती हक्क अधिनियम, **2005** अंतर्गत नियुक्त केलेले अधिकारी

| अनु. क्र. | सार्वजनिक माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | टपाल पत्ता | दूरध्वनी क्र. | एकापेक्षा जास्त पीआयओ असल्यास क्षेत्राचे/ क्रियाकलापांचे सीमांकन |
|---|---|---|---|---|
| 1. | उपसंचालक (राजभाषा) | 1ली लिफ्ट, 5 वा मजला, जुन्ता हाऊस, पणजी, गोवा पिन-403001. | 2420179/ 2420071 | पणजी |

| अनु. क्र. | सहायक सार्वजनिक माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | टपाल पत्ता | दूरध्वनी क्र. | एकापेक्षा जास्त एपीआयओ असल्यास क्षेत्राचे/ क्रियाकलापांचे सीमांकन |
|---|---|---|---|---|
| 1. | मुख्य कारकून | 1ली लिफ्ट, 5वा मजला, जुन्ता हाऊस, पणजी, गोवा पिन-403001. | 2420179/ 2420071 | पणजी |
| 2. | वरिष्ठ कारकून | | | |
| 3. | कनिष्ठ भाषांतरकार (कोंकणी) | | | |
| 4. | कनिष्ठ भाषांतरकार (मराठी) | | | |

| अनु. क्र. | प्रथम अपील प्राधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | टपाल पत्ता | दूरध्वनी क्र. | ई-मेल पत्ता |
|---|---|---|---|---|
| 1. | राजभाषा संचालक | 1ली लिफ्ट, 5वा मजला, जुन्ता हाऊस, पणजी, गोवा पिन- 403001. | 2420179/ 2420071 | 1. official.language 09@gmail.com<br>2. dir-dol.goa@nic.in |